# निविदा पत्रक

जा.क्र.विप्र/पसदुशा/दुध/ठेका/२१५/२१
दिनांक : ३०/०६/२०२१

प्रति,

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

विषयः पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील गाई/म्हशींचे ठेका पद्धतीने दुध काढण्यासंबंधीचे दर पुरविणेबाबत ...

वरील विषयाला अनूसरून या कार्यालयातील गाई/म्हशीचे दुध काढण्याचा ठेका दिनांक १६.०७.२०२१ ते १५.०१.२०२२ पर्यंत द्यावयाचे प्रस्तावीत आहे. तरी संबंधीतांनी त्यांच्या निवीदा सिलबंद पाकीटामध्ये दिनांक ०९.०७.२०२१ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ह्या कार्यालयास प्राप्त होतील या बेताने पाठवाव्यात/आणून द्याव्यात. दुध काढण्याचे दर प्रति लिटर प्रमाणे नमुद करावेत. निविदा निम्नलिखित अधिका-याच्या नावे पाठवाव्यात. पाकीटावर *"दुध काढण्याची निवीदा"* असे ठळक अक्षरात नमुद करावे. दिनांक ०९.०७.२०२१ नंतरच्या निवीदांचा विचार करण्यात येणर नाही याची नोंद घ्यावी.

सदरहु निवीदा दिनांक ०९.०७.२०२१ रोजी सायंकाळी ५.४५ वाजता विभाग प्रमुख यांचे दालनात त्यांचे हस्ते या विभागातील इतर समिती सदस्यांसमोर उघडण्यात येतील. ज्या व्यक्तीचे दर कमी असतील त्यालाचा ठेका देण्यात येईल. ठेका घेतांना नियम व अटीचे पालन करणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

सदर नियम व अटी सोबत जोडलेल्या आहेत.

विभाग प्रमुख
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# नियम व अटी

१. दुग्धशाळेमधील साधारणतः ३५ ते ४० दुधाळ जनावरांचे दुध दररोज सकाळ व संध्याकाळी काढावे लागेल.

२. साधारणतः १० जनांवराकरीता १ माणूस दूध काढणे व दूधाळ जनावरांची सांगीतलेली कामे करण्याकरीता नेमावा लागेल.

३. जनावरांचे दूध सकाळी ५.३० वाजता व दुपारी ४.०० वाजताच काढावे लागेल.

४. जनावरांचे खाद्य भांडारगृहातून आणून सकाळी व सायंकाळी सुचना दिल्याप्रमाणे टाकावे लागेल.

५. व्यालेल्या जनावरांचे वासरांना त्यांच्या आईचे (गाईचे) दूध पाजून गोठ्यात परत कोंडावे लागेल.

६. संपूर्ण दूध काढणे झाल्यावर कोणतेही जनावर मोकळे राहणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

७. दूध काढण्यापूर्वी जनांवरांना पाण्याने धुवून स्वच्छ करूनच दूध काढावे लागेल.

८. दूधातील जनावरांना दिवसातून दोन वेळा पाणी पाजावे लागेल.

९. वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल.

१०. कामे व्यवस्थित न झाल्यास किंवा गैरवर्तणूक आढळल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता ठेका बंद करण्यात येईल. या संबधीचे संपूर्ण अधिकार विभाग प्रमुखांना राहतील.

११. वरील कामाचा ठेका मध्येच/अर्धवट सोडून गेल्यास त्या महीन्यात केलेल्या कामाची रक्कम/मजुरी मिळणार नाही.

१२. दूध काढतांना कोणतेही माणसाला जखम नसावी, नखे वाढलेली नसावित व कपडे स्वच्छ असावेत तसेच त्याला तंबाखू किंवा धूम्रपान इ. चे व्यसन नसावे, जेणे करून स्वच्छ दूध काढले जाईल.

१३. जेव्हा दुध शिल्लक असेल तेव्हा शिल्लक दुध शासकिय दुध डेअरी अकोला येथे पोहोच करावे लागेल .

१४. भाडांरात उपलब्ध असलेल्या वेगवेगळया कमी प्रतीच्या धान्याचा मशीनवरून भरडा करून जनांवरांना द्यावा लागेल.

१५. नमूद केलेले कंत्राटी कामाचे दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील सहा महिन्याकरिता ग्राह्य राहतील.

१६. दर पत्रकातील दर हे सर्व करांसहित (GST सहित) असावेत.

१७. सदर कंत्राट घेणारे कंत्राटदार/संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. दरपत्रकासोबत कंत्राटधारकाचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नंबर, भविष्य निर्वाह निधी नोंदणी, अनुभव प्रमाणपत्र, आधारकार्ड, प्यान कार्ड, ई. प्रमाणपत्रे जोडण्यात यावीत.

१८. कंत्राटी काम करणाऱ्या मजुरांचे दोन फोटो, आधारकार्ड, व्यक्तीशः संपूर्ण माहिती, पत्ता व दोन ओळखीच्या व्यक्तींचे नावे ई. माहिती विभागास सादर करावी लागेल.

१९. कामावरील कंत्राटी मजुरांचे अपघात विमा, भ.नि.नि. खाते वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुरांचे देय्य लाभ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी हि सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदार/ठेकेदार/संस्था यांची राहील.

२०. कामावरील मजुरांचा विमा हा कंत्राटदार/ठेकेदार/संस्था यांनीच काढणे अनिवार्य राहील.

२१. कंत्राटी कामावरील मजुरांची संपूर्ण जबाबदारी हि सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदार/ठेकेदार/संस्था यांचीच राहील. कोणत्याही प्रकारच्या हानीची सदर कार्यालय भरपाई करून देणार नाही.

२२. सदर कामे हि पूर्णतः ठेका/कंत्राटी पद्धतीने असल्यामुळे मजुरांच्या जेष्ठता यादीत कोणत्याही प्रकारची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.

२३. कार्यालयात केलेल्या कामाचे कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.

२४. प्रत्येक महीन्यात केलेल्या मजुरीचे देयक सदर महीना संपल्यावर कार्यालयास सादर करावे लागेल

२५. वरिल नियम व अटींचे पालन न केल्यास सदर ठेका रद्द करण्यात येईल.

विभाग प्रमुख
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# <u>दरपत्रक</u>

(Form of Quotation)

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील दुग्धशाळेतील गायी/म्हशींचे दुध ठेका पद्धतीने काढण्याकरिता दरपत्रक.

| अ.क्र. | कंत्राटी कामाचे विवरण | दर प्रति लिटर दुध (रु.) |
|---|---|---|
| १. | पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील दुग्धशाळेतील गायी/म्हशींचे दुध दररोज सकाळी ५.३० व दुपारी ४.०० वाजता काढणे. | |

निविदेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

सही व शिक्का